Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March -2022

ISSUE No- (CCCXLIII) 343

## INDIAN WOMEN: PRESENT, PAST AND FUTURE



**Prof. Virag S. Gawande**
**Chief Editor**
Director
A.S.R.&,D. T.I.,Amravati.

**Dr. D.V. Meshram,**
Chief organizer:
I/C Principal

**Dr. B.V. Kendre,**
IQAC Coordinator
& Head Dept. of Chemistry

**Dr. Babasaheb Shep**
**Editors**
Head of History Department

**Dr. Ramesh Rathod,**
**Editors**
Head, Department of Sociology

**Dr. V. B. Gaikwad**
**Editors**
Department of Zoology

Vaidyanath College of Arts,Science & Commerce, Parli-Vaijnath

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

**Impact Factor-8.575 (SJIF)** **ISSN-2278-9308**

# B.Aadhar


Peer-Reviewed & Refreed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

## March -2022

**ISSUE No- (CCCXLIII) 343**

## INDIAN WOMEN: PRESENT, PAST AND FUTURE



**Prof. Virag S. Gawande**
**Chief Editor**
Director
A.S.R.&,D. T.I.,Amravati.

**Dr. D.V. Meshram,**
Chief organizer:
I/C Principal

**Dr. B.V. Kendre,**
IQAC Coordinator
& Head Dept. of Chemistry

**Dr. Babasaheb Shep**
**Editors**
Head of History Department

**Dr. Ramesh Rathod,**
**Editors**
Head, Department of Sociology

**Dr. V. B. Gaikwad**
**Editors**
Department of Zoology

**Vaidyanath College of Arts,Science & Commerce, Parli-Vaijnath**

**This Journal is indexed in :**

- **Scientific Journal Impact Factor (SJIF)**
- **Cosmos Impact Factor (CIF)**
- **International Impact Factor Services (IIFS)**

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar PUBLICATIONS

Impact Factor – 8.575 ISSN – 2278-9308

Sonpeth Pin-431516 Late Ramesh Warpudkar ACS College Tq.Sonpeth Dist.Parbhani

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refereed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## March -2022

**ISSUE No- (CCCXLIII) 343**

# INDIAN WOMEN: PRESENT, PAST AND FUTURE

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr. D.V. Meshram**
Chief organizer:
I/C Principal

**Dr. B.V. Kendre**
IQAC Coordinator

Editor
**Dr. Babasaheb Shep**
Head of History Department

Editor
**Dr. Ramesh Rathod**
Head, Department of Sociology

Editor
**Dr. V. B. Gaikwad**
Department of Zoology

**Vaidyanath College of Arts,Science & Commerce, Parli-Vaijnath.**

## Aadhar International Publication

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.575,Issue NO, 343 (CCCXXXVIII)

ISSN : 2278-9308
March, 2022

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin 431516 Sonpeth Dist.Parbhani

# INDEX



| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | जागतिक राजकारणात महिला सहभाग | प्रा. डॉ.बापुराव वि.आंधळे | 1 |
| 2 | हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील महिलांचे योगदान | बांगर स्वाती आदिनाथ | 4 |
| 3 | असंघटित क्षेत्रातील महिलांचे सबलीकरण-एक अभ्यास | प्रा. डॉ. आंबादास पांडुरंग बर्वे | 8 |
| 4 | भारतीय राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रिया | डॉ. बावलगावे सी. एम. | 13 |
| 5 | संततिनियमन चळवळीतील पहिल्या शिलेदार : मालतीबाई कर्वे | डॉ. सुभाष गणपतराव बेंजलवार | 17 |
| 6 | भारतीय स्त्रियांची सुरक्षा आणि दलित चळवळ | डॉ. किरण चक्रे | 22 |
| 7 | ग्रामीण भागातील स्त्रियांच्या समस्या | आबासाहेब माणिकराव देशमुख | 25 |
| 8 | पंडिता रमाबाई : प्रागतिक भूमिका व कार्य | प्रा. एम.पी.देशपांडे | 28 |
| 9 | आर्थिक सामाजिक समावेशनाचा स्त्रियांच्या सशक्तीकरणातील योगदान | डिके विनोद रमेश | 33 |
| 10 | भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महिलांचा सहभाग | डॉ. गंगणे अमोल उत्तमराव | 39 |
| 11 | भारतीय क्रांतीकारकांच्या चळवळी आणि स्त्रियांचे योगदान | प्रा. डॉ. जाधवर बी.डी. | 42 |
| 12 | भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील क्रांतीकारी स्त्रियांचे योगदान | प्रा.डॉ.कदम मोतीराम विठ्ठलराव | 45 |
| 13 | बौध्द संघातील स्त्रियांचे योगदान : एक अभ्यास | प्रा. डॉ.रामभाऊ देवराव काशीद | 50 |
| 14 | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक कार्य | डॉ. सतीश खरात | 53 |
| 15 | स्त्रीवादी साहित्य कादंबरी (१८५० ते १९५०) एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप. | प्रा. श्री. अमोल अरूण कुंभार | 56 |
| 16 | शिलाहारकालीन जैन धर्मिय स्त्रियांची कामगिरी | कु. वनिता गंपू कुंभार | 61 |
| 17 | प्राचीन, मध्ययुगीन,आधुनिक स्त्रीजिवन एक अभ्यास | प्रा. डॉ. सौ. एस. पी. लाखे | 64 |
| 18 | कोरोना महामारीचा महिलांच्या जीवनावर झालेला दूरगामी परिणाम | चित्रा भारत पगारे /डॉ. जयश्री महाजन | 71 |
| 19 | सातवाहन नृपती हाल संपादित गाहासत्तसई (गाथासप्तशती)तील स्त्रीजीवन | प्रा. डॉ.माधवी महाके /श्रीमाला के.जी | 76 |
| 20 | जागतिकीकरण आणि भारतीय स्त्री : एक सामाजिक दृष्टीकोन | डॉ. गजानन रा. मुधोळकर | 82 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575,Issue NO, 343(CCCXLIII)
ISSN : 2278-9308
March, 2022

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# जागतिक राजकारणात महिला सहभाग

प्रा. डॉ.बापुराव वि.आंधळे
राज्यशास्त्र विभाग, कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ, जि .परभणी ४३१५१६ मो.८८३००६६३५५

**प्रस्तावना:-**

हेरॉल्ड लॉस्वेलहा विचारवंत म्हणतो,'कोणाला, केव्हा आणि कसे मिळते याचा अभ्यास म्हणजे राजकारण होय'राजकारणाचा मुख्य केंद्रबिंदू सत्ता हा असतो.सत्तेशिवाय आपण कोणताच निर्णय घेऊ शकत नाहीत.म्हणुन राजकारणात किंबहुना लोकशाहीमध्ये व्यक्तीचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग अत्यंत महत्त्वाचा असतो निर्णय प्रक्रियेत ज्या लोकांना सहभाग मिळत नाही किंवा योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व मिळत नाही असे लोक आपोआपच मागास ठरतात . आज जगातील बहुतांश देशांनी लोकशाही या हा राजकीय व्यवस्थेचा स्वीकार केला आहे. लोकशाहीमध्ये बहुमताला आणि लोकसहभागाला अधिक महत्त्व असते. कोणताही निर्णय हा बहुमताच्या आधारावर घेतला जातो.

जगातील ज्या प्रमुख लोकशाही शासन व्यवस्था आहेत त्यामध्ये महिलांचे प्रमाण किती आहे? हे अभ्यासणे महत्वाचे वाटते, कारण की, जगातील अमेरिका, इंग्लंड ,फ्रान्स ,भारत ,जर्मनी ,ब्राझील, दक्षिण आफ्रिका यासारख्या विविध लोकशाही देशांमधून महिलांचा निर्णय प्रक्रियेत किती सहभाग आहे हे अभ्यासणे आवश्यक आहे. कारण की एकूण लोकसंख्येच्या तुलनेत महिलांचे प्रमाण हे निम्मे आहे. त्यामुळे या देशांमधील राजकारणात महिलांचा कितपत सहभाग आहे हा या शोध निबंधाचा अभ्यासाचा मुख्य हेतू आहे.

जागतिक परिस्थितीचा विचार करता जगात पुरुषसत्ताक संस्कृती आहे. महिलांच्या तुलनेत पुरुषांना अधिक महत्त्व दिले जाते. तसेच पुरुष महिलांवर वर्चस्व गाजवतात. त्यामुळे महिलांचा एकूणच विकास खुंटलेला आहे.राजकारण, समाजकारण व अर्थकारण यामध्ये महिलांचा वाटा अत्यल्प आहे. तो येणाऱ्या काळात वाढवण्यासाठी त्यांचा राजकीय सहभाग वाढवणे आवश्यक आहे.

**जागतिक पातळीवरील महिला नेतृत्व :-** प्राचीन काळ मध्ययुगीन काळ यांच्या तुलनेत आधुनिक काळात महिलांचा राजकारणातील सहभाग निश्चितच चांगला असा आहे. जागतिक पातळीवर विचार करतात आज प्रत्येक क्षेत्रात महिलांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. याला राजकारण हे क्षेत्र सुद्धा अपवाद नाही. जगातील विविध देशांमधून राजकारणात महिला नेतृत्वाने आपली ओळख जागतिक पातळीवर निर्माण केली आहे. यामध्ये हिलरी क्लिंटन कमला हरीश(उपराष्ट्रपती)अमेरिका, मागरिट थॅचर(पंतप्रधान) ,राणी एलिझाबेथ,थेरसामे (पंतप्रधान)इंग्लंड, अंजना मर्केल(चॅन्सलर)जर्मनी, प्रतिभा पाटील,(राष्ट्रपती), इंदिरा गांधी(पंतप्रधान) सोनिया गांधी भारत, शेख हसीना व खालिदा जिया बांगलादेश,जसिकाआर्डन(पंतप्रधान) न्युझीलँड,आन-सा-सुकी म्यानमार ,मेघवती सुकार्नोपुत्री इंडोनेशिया यासारख्या विविध देशांमधील महिला राजकीय नेतृत्वांनी आपापल्या देशाबरोबरच जागतिक पातळीवर आपलीस्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

जागतिक पातळीवर केवळ राजकीय क्षेत्रात नाही तर समाजाच्या विविध क्षेत्रात आज महिला आपला ठसा उमटवत आहेत. यामध्ये उद्योग, व्यवसाय, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, दळणवळण, तंत्रज्ञान, अवकाश यासारख्या विविध क्षेत्रातील महिलांनी मोठी कामगिरी केली आहे. परंतु एकूणच जागतिक पातळीवर आजही पुरुषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व आहे. यामुळे कोणत्याही देशात महिला पुरुषांच्या तुलनेत अजूनही मागे आहेत. समाजातील सर्वसामान्य स्त्रियांवर आजही 'अबला नारी' असा शिक्का मारला जातो. तसेच त्यांना अनेक अन्याय, अत्याचाराला सामोरे जावे लागते. म्हणून समाजाच्या या वंचित घटकाला समाजाच्या बरोबरीचे स्थान प्राप्त करून द्यायचे असेल तर राजकीय क्षेत्रामध्ये त्यांना योग्य प्रतिनिधित्व मिळवून देणे आवश्यक आहे.

**महिलामताधिकार :-** कोणत्याही लोकशाही देशांमध्ये राजकीय प्रक्रियेत सहभाग नोंदविण्यासाठी मतदानाचा अधिकार अनिवार्य आहे. मतदानाच्या अधिकाराचा शिवाय आपण राजकीय प्रक्रियेतील इतर अधिकार उपभोगू शकत नाहीत. मतदानाचा अधिकार मिळवण्यासाठी महिलांना जागतिक पातळीवर आपापल्या देशातील व्यवस्थांच्या विरोधात संघर्ष करावा लागला आहे. एकोणिसाव्या शतकात अमेरिका, युरोप व आफ्रिका खंडातील महिलांनी चळवळी करून मतदानाचा अधिकार मिळवला आहे. कारण की, कोणत्याच देशाने मतदानाचा अधिकार महिलांना सहजासहजी दिला नाही.

Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

तक्ता:- १

| देश | पुरुष | महिला | सर्व |
|---|---|---|---|
| न्युझीलंड | १८४८ | १८९३ | १८९३ |
| फ्रान्स | १८४८ | १९४४ | १९४५ |
| ब्राझील | १८९१ | १९३२ | १९८५ |
| जर्मनी | १८७१ | १९१९ | १९१९ |
| स्वित्झर्लंड | १८४८ | १९७१ | १९९१ |
| अमेरिका | | १९२० | १९२० |
| भारत | १९५० | १९५० | १९५० |
| जपान | १९२५ | १९४५ | १९४७ |
| रशिया | १९१७ | १९१७ | १९१७ |
| कॅनडा | १९२० | १९२० | १९६० |

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक पातळीवर अनेक नवनवीन देश स्वतंत्र झाले. आफ्रिका आणि आशिया खंडातील अनेक देशांनी स्वातंत्र्य मिळताच आपल्या महिलांना मतदानाचा अधिकार दिला. यामध्ये भारत,पाकिस्तान,इंडोनेशिया, फिलिपाइन्स या देशांचा समावेश होतो.तसेच अनेक देशांनी महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी त्यांना विशेष सवलती दिल्या.

**महिलाप्रतिनिधित्व :-** केवळ मतदानाचा अधिकार मिळाल्यामुळे महिलांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग निश्चित होत नाही तर त्यासाठी त्यांना आपापल्या राजकीय व्यवस्थांमध्ये किंवा संसदेत प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. प्रतिनिधित्व नसेल तर निर्णयावर आपण प्रभाव पाडू शकत नाहीत. जागतिक पातळीवरील लोकशाही देशांचा अभ्यास करता, महिलांचा मतदानातील सहभाग५०%च्याजवळपास आहे .परंतु प्रतीनिधित्वाचे प्रमाण हे समतेच्या तत्वाला धरून नाही. प्रतीनिधित्वाच्या बाबतीत हे प्रमाण जवळपास ३० टक्के च्या आसपास असणे समाधानकारक मानल्या जाते. परंतु हे प्रमाण प्रत्यक्षात फार कमी आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारतीय लोकशाहीचा उल्लेख केला जातो. भारतीय संसदेमध्ये सोळाव्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये संसदेत प्रतिनिधित्व करणाऱ्या महिलांचे प्रमाण हे केवळ १२ टक्के एवढे आहे.

१९५१ मध्ये जागतिक पातळीवरील काही प्रमुख देशांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व या प्रकारे होते .भारत ५%टक्के, अमेरिका २%टक्के, ब्रिटन ३%टक्के महिला प्रतिनिधित्वहोते. सध्या भारतात १२% टक्के ,अमेरिकेत २०% टक्के तर इंग्लंडमध्ये ३२% टक्के महिला प्रतिनिधित्व करतात . जर्मनीमध्ये १९८० मध्ये महिलांचे प्रमाण ६% टक्के होते ते आज जवळपास ३०% टक्के आहे. जर्मनीत राजकीय पक्षांनी स्वतःहून राखीव जागा देण्याची पद्धती स्वीकारली त्यामुळे हे प्रमाण अधिक पटीने वाढले आहे. एकूण १९३ देशांच्या सर्वेक्षणात भारत जागतिक क्रमवारीत १४९ व्या स्थानावर आहे भारतापेक्षा अफगाणिस्तान , पाकिस्तान,बांग्लादेश, सौदी अरेबिया आणि सुदाम या सारख्या देशांमध्ये सुद्धा महिलांचे संसदेतील प्रतिनिधित्व अधिक आहे. जागतिक सरासरीच्या२५% महिला विविध देशांमधील संसदेत प्रतिनिधित्व करताना दिसून येतात.

तक्ता :- २

**कनिष्ठ सभागृह महिला प्रतिनिधित्व/वरिष्ठ सभागृह महिला प्रतिनिधित्व**

| क्रम | देश | निवडणूक | ए.जागा | महिला | %टक्के | निवडणूक | जागा | महिला | टक्के |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रवांडा | ०३/०९/२०१८ | ८० | ४९ | ६१.३ | २६/०९/२०११ | २६ | १० | ३८.५ |
| २ | क्युबा | ११/०३/२०१८ | ६०५ | ३२२ | ५३.२ | - | - | - | - |
| ३ | बोलिविया | १२/१०/२०१४ | १३० | ६९ | ५३.१ | १२/१०/२०१४ | ३६ | १७ | ४७.२ |
| ४ | मेक्सिको | ०१/०७/२०१८ | ५०० | २४२ | ४८.२ | ०१/०७/२०१८ | १२८ | ६३ | ४९.२ |
| ५ | स्वीडन | ०९/०९/२०१८ | ३४९ | १६५ | ४७.३ | - | - | - | - |
| १७ | फ्रान्स | ११/०६/२०१७ | ५७७ | २२९ | ३९.७ | २४/०९/२०१७ | ३४८ | ११२ | ३२.२ |
| ३७ | स्वित्झर्लंड | १८/१०/२०१५ | २०० | ६५ | ३२.५ | २३/१०/२०११ | ४६ | ०७ | १५.२ |
| ३९ | इंग्लंड | ०८/०६/२०१७ | ६५० | २०८ | ३२.० | नियुक्ती | ७८९ | २०८ | २६.४ |
| ७६ | अमेरिका | ०६/११/२०१८ | ४३३ | १०२ | २३.६ | ०६/११/१८ | १०० | २५ | २५.० |
| १४९ | भारत | ०७/०४/२०१४ | ५२४ | ६६ | १२.६ | १६/०१/२०१८ | २४४ | २८ | ११.५ |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) -8.575,Issue NO, 343(CCCXLIII)

ISSN : 2278-9308 March, 2022

स्त्रोतः- वर्ल्डइकॉनॉमिकफोरम

महिलाप्रतिनिधित्ववाढविण्याचे प्रयत्नः-

जगातील अनेक लोकशाही देशांच्या आपल्या देशातील महिलांनाचे संसदेतील प्रतिनिधित्व वाढावे म्हणून वेगवेगळे प्रयत्न केले आहेत. यासाठी आपल्या संविधानामध्ये तरतुदी करणे, राखीव जागा ठेवणे किंवा निवडणूक आयोगास तसे अधिकार देणे.यासारख्येप्रयत्नकेलेलेदिसून येतात. जगातील महिलांना योग्य प्रतिनिधित्व देण्यात येणाऱ्या देशांमध्ये फ्रान्स,स्वीडन, नॉर्वे, फिनलंड, अर्जेंटिना, मोझांबिक या दक्षिण आफ्रिका रवांडा या देशांचा वरचा क्रमांक आहे. या देशांनी आपापल्या पातळीवर महिलांना प्रतिनिधित्व देण्यासंदर्भात योग्य त्या तरतुदी केल्या आहेत. रवांडा सारख्या मागास देशाने ३० टक्के महिलांसाठी संसदेत राखीव जागा ठेवल्या आहेत.तर नॉर्वे, स्वीडन आणि फिनलंड, अर्जेंटिना या देशांनी राजकीय पक्षांनी महिलांना ३० टक्के जागांवर उमेदवारी देण्याच्या संदर्भातील तरतुदी केल्या आहेत. तर काही देशांनी राजकीय पक्षांच्या उमेदवारांच्या प्राधान्यक्रमात प्रत्येक तिसरे नाव हे महिला उमेदवारांचे असले पाहिजे अशी तरतूद केली आहे. नेपाळ, फिलिपाईन्स, युगांडा या देशांनी संविधानात तरतूद केली आहे. तर बेल्जियम फ्रान्स, स्लोव्हेनिया यांनी निवडणूक कायद्याद्वारे महिलांचा कोठा निश्चित केला आहे.

भारतामध्ये१९९६मध्ये सर्व प्रथम संसदेत महिलांना३३%आरक्षण देण्यासंबंधी विधेयक मांडण्यात आले.त्यानंतर२०१०मध्ये भारतीय संसदेत महिला आरक्षण विधेयक मांडण्यात आले. परंतु अद्याप या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले नाही. त्यामुळे आजही भारतीय संसदेमध्ये महिलांना योग्य प्रतिनिधित्व मिळाले नाही. भारतीय मतदारांची संख्या जवळपास ९१कोटीयेवढी आहे. यामध्ये ४३कोटी मतदार महिला आहेत. याचाच अर्थ जवळपास पन्नास टक्के महिला मतदार आहेत. परंतु संसदेत त्यांचे प्रतिनिधित्व हे अत्यल्प असे आहे.

भारतीय संसदेत महिलांना३३% आरक्षण विधेयक मंजूर करून घेणे आज तरी शक्यवाटत नाही .सन२०१४ मध्ये भारतीय संसदेत सत्तांतर होऊन भारतीय जनता पक्षाचे सरकार स्थापन झाले आहे. पुढे २०१९ च्या संसदीय निवडणूकीत पुन्हा एकदा भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदींना संसदेत२/३बहुमत आहे.याबाबत आज या सरकारने योग्य पावले उचलली तर भारतीय महिलांना ३३% आरक्षण विधेयक मंजूर होऊ शकते.परंतु या सरकारने अद्याप या विधेयकाची कोणतीच दखल घेतली नाही.२०२२च्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने उत्तरप्रदेशात४०% महिलांना उमेदवारी देण्याचा निर्णय घेतला आहे.याला तेथील मतदार किती प्रमाणात प्रतिसाद देतील हे येणारा काळच ठरवेल.

**समारोप :-** महिला शक्ती राष्ट्रशक्तीचे अभिन्न अंग आहे. तिच्या सर्वांगीण सहभागाशिवाय कोणतेही राष्ट्र आपला विकास करू शकत नाही. म्हणून पुरुषांच्या बरोबरीने महिलांना सुद्धा आर्थिक, सामाजिक, राजकीय,सांस्कृतीक आणि नागरी क्षेत्रात वैधानिक समान संधी मिळाल्या पाहिजेत. यासाठीच संयुक्त राष्ट्र संघटना ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिवस (World Women Day) म्हणून सर्वत्र साजरा करते. अमेरिकेतील स्त्री कामगारांनी केलेल्या ऐतिहासिक कामगिरीच्या स्मरणार्थ ८ मार्च १९०८ पासून हा दिवस जागतिक महिला दिवस म्हणून पाळला जातो.

सन २०२२च्या जागतिक महिला दिवसाची थीम 'स्थायी उद्यासाठी आज लैंगिकसमानता'(gender equality today for a sustainable tomorrow) ही आहे.

आजही जगात स्त्री-पुरुष समानता आलेली नाही. स्त्रियांना प्रत्येक क्षेत्रात दुय्यम वागणूक दिल्या जाते. म्हणून ही परिस्थिती बदलणे काळाची गरज आहे.विशेषतः तिसऱ्या जगातील महिला आजही अत्यंत मागास आहेत.शिक्षण,आरोग्य,विज्ञान, तंत्रज्ञान या क्षेत्रात महिलांचे प्रतिनिधित्व अत्यंत कमी आहे. यामुळेच महिलांवर अन्याय, अत्याचार मोठ्या प्रमाणात होतात.महिलांची परिस्थिती बदलण्यासाठी ती राजकीय क्षेत्रात पुढे आली तर तिच्या बाजूचे कायदे करून तिची ही परिस्थिती बदलता येईल. म्हणून महिलांना जागतिक पातळीवरीलविविधलोकशाहीदेशांमधूनसमान प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची :-**

□) www.vikipeadia.com
□) www.bbc.com
□) www.loksatta.com
□) राजनितिक विज्ञान-डॉ.जोहरीडी.जे.
□) आधुनिक भारताचा इतिहास- ग्रोव्हरबी.एल.
□) साप्ताहिक साधना
□) साप्ताहिक योजना

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani